NO. S391/2016

धर्मादाय आयुक्त भवन,
३रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्रमांक २४९३५४३४ २४९३५४९०
फॅक्स २४९७६४२०

18 OCT 2016

परिपत्रक क्र. 475 दिनांक 18/10/2016

दि.०२.१०.२०१६ पासुन संस्था नोंदणी अधिनियमाची प्रकरणे सेवा हमी योजनेअंतर्गत घेतली गेल्यामुळे ही प्रकरणे तीन महिन्यात निकाली काढली जाणे बंधनकारक आहे.

आजच्या तारखेस मुंबई कार्यालयात याबाबतची सुमारे ९०० प्रकरणे प्रलंबित असल्याचे दिसून येते. ही सर्व प्रकरणे अधिकाऱ्यांमध्ये विभागली गेलेली असून प्रत्येक अधिकाऱ्यांकडे बरीच प्रकरणे प्रलंबित आहेत.

संबंधित अधिक्षक यांना आदेशित करण्यात येते की त्यांनी या सर्व फाईल्स संबंधित अधिकाऱ्यांकडे सोपवाव्यात आणि संबंधित अधिकाऱ्यांनी ही प्रकरणे एका महिन्यात निकाली निघतील याकडे लक्ष द्यावे.

नवीन दाखल झालेली प्रकरणे अधिक्षकांनी स्विकारल्यावर त्यातील दस्तऐवज, प्रतिज्ञालेख इत्यादी मुळ दस्तऐवजांशी तुलना करुन तपासून घ्यावीत आणि त्याचदिवशी नोंदणी शुल्क भरुन घ्यावे व प्रकरण संबंधित अधिकाऱ्यापुढे ठेवावे.

संबंधित अधिकाऱ्यांनी सर्व कागदपत्रांची पुर्तता झालेली असल्यास त्याच दिवशी किंवा शक्यतो १०-१५ दिवसांत पुढील आदेश करावेत.

प्रकरणांचा निपटारा करताना अधिकाऱ्यांनी pragmatic दृष्टीकोन ठेवावा.

(श.भा.सावळे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. धर्मादाय सह आयुक्त, बृहन्मुंबई / मुख्यालय- १, २
२. धर्मादाय उप आयुक्त, बृहन्मुंबई / मुख्यालय
३. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त, बृहन्मुंबई / मुख्यालय
४. सर्व अधिक्षक, बृहन्मुंबई / मुख्यालय
५. कार्यालयीन नोंदवही